# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विविध शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या अर्ज मुदतवाढीसंदर्भात
### शैक्षणिक वर्ष २०१८—१९

**"क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना"**
**"आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजना"**
**"राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना"**
**" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना"**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग अव्यवसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८—१९ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत परिपत्रक क्र. २३७/२०१८ अन्वये दि. १५/०१/२०१९ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन (Online) अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात येत असून पात्र विद्यार्थ्यांनी परिपत्रकातील विहित नियम व अटीनुसार **दि. २०/०१/२०१९** पर्यंत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करावेत. तसेच महाविद्यालय/ विद्यापीठ विभागाने विद्यार्थीनी ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेल्या अर्जांची छाननी करून आपल्या महाविद्यालय/ विद्यापीठ विभागाच्या PUNCODE वरून **दि. २५/०१/२०१९** पर्यंत (Online) पध्दतीने विद्यापीठास सादर करावे.

वरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यासाठी यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ }
संदर्भ : शै.प्रवेश/१९२ }
दिनांक : १५/०१/२०१९ }

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता

मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७

मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालय (अव्यवसायिक अभ्यासक्रम)

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.

Desktop/University Scholarships 2018-19/Extension Circular 2018-19